# अन्न व औषध प्रशासन, म.राज्य.

प्रस्तावना :

अन्न व औषध प्रशासन (एफडीए) ही ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणारी प्रमुख संस्था असून महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखाली येते. ग्राहकांना उत्तम दर्जाची औषधे, सौंदर्य प्रसाधने व सुरक्षित व दर्जेदार अन्न पदार्थ मिळण्यासाठी त्यासंबंधी असलेल्या अधिनियमांची अंमलबजावणी या प्रशासनामार्फत करण्यात येते.

अन्न व औषध प्रशासनाचे मुख्य कार्यालय वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई येथे असून विभागीय व जिल्हा पातळीवर कार्यालये आहेत. आयुक्त हे प्रशासनाचे प्रमुख असून ते अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत ते राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त म्हणून सुध्दा अधिसूचित आहेत.

अन्न विषयक आणि औषध विषयक कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनामध्ये खालील स्वतंत्र विभाग आहेत. त्याबाबत माहिती खालील प्रमाणे आहे.

(अ) औषध विभाग

(ब) अन्न विभाग

(क) औषध व अन्न नियंत्रण प्रयोगशाळा.

प्रशासनात सह आयुक्त (दक्षता) हे जनतेच्या तक्रारी व अधिकारीच्या विरुद्ध तक्रारीची चौकशी करतात. सह आयुक्त (विधी) हे अंतर्गत प्रशासनाचे काम पाहतात. सह आयुक्त (औषधे) मुख्यालय हे औषध विभागाचे प्रमुख असून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याअंतर्गत नियंत्रण प्राधिकारी म्हणुन घोषित आहेत. सह आयुक्त (अन्न) मुखालय अन्नाबाबतचे धोरण, मार्गदर्शक तत्त्वे इत्यादींचे काम ते पाहतात.

सह आयुक्त बृहन्मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर हे त्यांच्या विभागात प्रमुख म्हणून काम पाहतात. सहायक आयुक्त जिल्हा कार्यालय प्रमुख आहेत.

<u>(अ) औषध विभाग :</u>

औषधांचा वापर हा मानवी जीवन सुसह्य होण्यासाठी असून ग्राहकांना प्रमाणित व उत्तम दर्जाची औषधे मिळणे, तसेच त्यांना गुणवत्तापूर्ण सौंदर्य प्रसाधने मिळणे यासाठी असलेल्या अधिनियमांची अंमलबजावणी करण्याचे कर्तव्य अन्न व औषध प्रशासनावर सोपविण्यात आले आहे. या प्रशासनाद्वारे औषध विषयक खालील अधिनियमांची अंमलबजावणी करण्यात येते.

(१) औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५.

(२) औषधे व जादुटोणादि उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम १९५४.

(३) जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत पारीत औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३.

(४) नारकोटिक ड्रग्स ॲण्ड सायक्रोटॉपिक सबस्टनसेस अधिनियम १९८५.

(५) विषारी द्रव्ये कायदा १९१९ व त्याखालील नियम आणि महाराष्ट्र विषारी द्रव्ये नियम १९७६,

या वरील सर्व अधिनियमांची / नियमांची / आदेशांची राज्यात अंमलबजावणी करून जनतेचे आरोग्य सुस्थितीत राखण्यासाठी खालील प्रकारची यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे.

**राज्यस्तरीय** :- आयुक्त-सह आयुक्त-सहायक आयुक्त-औषध निरिक्षक
**विभागस्तरीय** :- सहआयुक्त-सहायक आयुक्त- औषध निरिक्षक
**जिल्हास्तरीय** :- सहायक आयुक्त- औषध निरिक्षक

या विभागांच्या माध्यमातुन खालील प्रकारची कर्तव्ये प्रशासनाकडून बजावण्यात येतात.

(१) औषध निर्मिती:-

औषध निर्मिती ही औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्या अंतर्गत नियम १९४५ च्या तरतुदी अंतर्गत नियंत्रित कार्यपध्दती असून ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक व युनानी, होमिओपॅथिक औषधे व सौंदर्य प्रसाधने आणि वैदेकीये उपकरणे राज्यामध्ये कोणीही अनुज्ञप्तीशिवाय उत्पादित करू शकत नाहीत. औषधे व सौंदर्य प्रसाधने यांचे उत्पादन अनुज्ञाप्ती अंतर्गतच करणे अनिवार्य आहे. गुणवत्तापूर्ण ॲलोपॅथिक औषधे राज्यात निर्माण व्हावीत म्हणून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याच्या तरतुदीनुसार विशेषतः या नियमाअंतर्गत असलेल्या चांगली उत्पादन पध्दती (अनुसूची एम) मधील तरतुदींचा अवलंब करून जे अर्जदार राज्यात औषध उत्पादन करू इच्छितांत त्यांना अशा अनुज्ञप्ती विशिष्ट अटी व शर्थीवर मंजूर केली जाते. या अटींमधील ३ महत्वाच्या अटी म्हणजे, औषध निर्मिती ही सक्षम तांत्रिक व्यक्तींच्या देखरेखीखाली होणे, औषध निर्मिती करीता वापरण्यात येणा-या कच्चा मालाच्या गुणवत्तेबाबत प्रयोगशाळेत तपासणी करून खात्री करणे, उत्पादित औषध बाजारात विक्रीकरिता खुले करण्यापूर्वी त्यांच्या गुणवत्तेबाबत प्रयोगशाळेकडून पुन्हा एकदा तपासणी करून खात्री झाल्यानंतरच ते बाजारात विक्रीसाठी आणणे, हे आहेत.

सह आयुक्त (औषधे) मुख्यालय हे या कायद्या अंतर्गत राज्याचे औषध नियंत्रक म्हणून घोषित आहेत .

विभागीय सह आयुक्त (औषधे) यांना औषध उत्पादन परवाना आणि सौंदर्य प्रसाधने उत्पादन परवाना मंजुरीसाठी अनुज्ञाप्ती प्राधिकारी म्हणून घोषित केले असून अशा उत्पादकांची वर्षातुन किमान एक वेळ तपासणी करणे वैधानिक दृष्ट्या आवश्यक असल्याने औषध निरिक्षकांमार्फत उत्पादकांच्या तपासण्या करण्यात येतात.

राज्यात उत्पादकांकडून औषध निर्मिती योग्य प्रकारे केली जाते, चांगली उत्पादन पध्दती कार्यरत आहे किंवा नाही याची शहानिशा वैधानिक तरतुदीनुसार करण्याची राज्यस्तरावरील जबाबदारी नियंत्रण प्राधिकारी म्हणून सह आयुक्त (मुख्यालय), परवाना प्राधिकारी आणि औषध निरीक्षक यांची असून सर्व औषध निरीक्षक हे औषध नियंत्रक यांच्या नियंत्रणातील अधिकारी आहेत.

**राज्यात खालीलप्रमाणे औषध उत्पादक आहेत.**

ॲलोपॅथिक औषध उत्पादक
आयुर्वेदिक व युनानी औषध उत्पादक...
होमिओपॅथिक औषध उत्पादक
सौंदर्य प्रसाधने औषध उत्पादक
वैद्यकीय उपकरणे उत्पादक

**औषध निर्यात :-**

औषधांची निर्यात करून परकीय चलन मिळविण्याबरोबरच राज्यांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्याची क्षमता औषध निर्यात करण्यामध्ये आहे. साधारणतः औषध निर्यात करण्याकरीता जागतिक आरोग्य संघटनेने आखून दिलेल्या मानकानुसार उत्पादकाने सोयी व उत्पादन पध्दती पुरवणे आवश्यक आहेत. जे उत्पादक या मानकानुसार चांगली उत्पादन पध्दती पुरवितात. अशांना WHO-GMP प्रमाणपत्र प्रशासनाद्वारे मंजुर करण्यात येतात. असे उत्पादक औषध निर्यात करू शकतात. तसेच काही प्रगत राष्ट्रांना औषध निर्यात करण्यासाठी त्या त्या देशाच्या नियंत्रणाखालील प्राधिकरणाची मंजुरी आवश्यक असते. जसे USFDA मान्यता (अमेरिका). MHRA मान्यता (इंग्लंड) इत्यादि. राज्यात WHO-GMP प्रमाणपत्र घारक एकूण उत्पादक २३०, व उसनवार उत्पादक एकुण ३२३ आहेत. राज्यातुन होणारी औषधांची निर्यात ही देशातील इतर कोणत्याही राज्यातुन होणा-या औषधाच्या निर्यातीपेक्षा जास्त आहे. राज्यातील उत्पादित औषधांचा दर्जा निश्चितपणे चांगला असून परदेशात राज्यातुन उत्पादित होणा-या औषधांना चांगली मागणी आहे.

राज्यातुन औषध निर्यातीस अधिक चालना मिळावी म्हणून दिनांक १५ ऑगस्ट, २०१२ मध्ये अन्न व औषध प्रशासनाने अशा निर्यातीसाठी आवश्यक WHO-GMP प्रमाणपत्र ऑनलाईन देणे देशात सर्व प्रथम सुरू केले असून त्यासाठी योग्य अर्ज केल्यानंतर जलदगतीने  परवानग्या देण्यात येतात.

**(२) औषध विक्री / वितरण:-**

कोणीही व्यक्ती औषधांची विक्री किंवा वितरण हे बिना परवाना विक्री करू शकत नाही. ही विक्री परवाने अंतर्गतच करणे अनिवार्य आहे. या विभागाद्वारे औषध विक्री किंवा वितरणासाठीचे परवाने मंजूर करण्यात येतात.

औषधांची रुग्णाकरिता उपलब्धता हा अत्यंत संवेदनशील असा विषय असून औषध बहुतांशी वेळा तीव्र रसायन स्वरुपात असल्याने त्याचा वापर योग्य पध्दतीने झाला नाही तर त्याचे अत्यंत विपरित परिणाम सुध्दा रुग्णांना भोगावे लागतात. कधी रुग्णाचा मृत्युही संभवतो. त्यामुळे औषधांची विक्री / वितरण ही नियंत्रित केली असून औषध उत्पादनापासून ठोक विक्री, किरकोळ विक्री ते रुग्ण हा प्रवास अनुज्ञप्तीच्या माध्यमातुन आणि सक्तीच्या बिलाच्या माध्यमातुन नियंत्रित केला आहे.

औषधांचा विनाव्यत्यय पुरवठा सुरू ठेवणे, उत्पादक / पुरवठादारांची मक्तेदारी न होणे याकरिता जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत औषध हे जीवनावश्यक वस्तू म्हणून अधिसूचित असून कोणताही उत्पादक सबळ कारणाशिवाय औषधाचा पुरवठा / औषध विक्री नाकारु शकत नाही. तसे कोणताही किरकोळ औषध विक्रेता रुग्णांना औषध पुरवठा नाकारु शकत नाही.

औषध हे मानवाच्या मानसिक व शारिरीक व्याधी कमी करणारा महत्वाचा घटक असून त्यामुळे मानवी जीवन सुकर होण्यास मदत झाली आहे. तथापि असे घटक चुकीच्या पध्दतीने दिले गेल्यास ते मानवी जीवनास घातक ठरते, हे गंत शतकाच्या सुरवातीस दृष्टीस आले असल्याने औषध विक्री अत्यंत काळजीपूर्वक आणि जबाबदारीच्या दृष्टीकोनातून व्हावी आणि तांत्रिक व्यक्तींच्या नियंत्रणाखाली व्हावी अशी तरतूद जगातील बहुतांशी राष्ट्रांमध्ये आहे. तशीच तरतुद औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५ मध्येही करण्यात आलेली आहे. या अधिनियमांतर्गत प्रमुख तरतुदी या रुग्णाच्या जीवितावर दुष्परिणाम होऊ नये म्हणून संसदेने अत्यंत काळजीपूर्वक केलेले आहेत. त्या खालील प्रमाणे आहेत.

(अ) रुग्णांना औषध विक्री फार्मासिस्टच्या देखरेखीखालीच केली पाहिजे.

(ब) प्रिस्क्रीप्शन औषधांची विक्री ही प्रिस्क्रीप्शनवरच झाली पाहिजे.

(क) औषध विक्री बिलाद्वारेच झाली पाहिजे.

नागरिकांनी औषध खरेदी ही डॉक्टर यांच्या चिट्टी वरच करावी, जेणे करून डॉक्टर यांच्या सल्ल्याशिवाय औषध घेण्याचे दुष्परिणाम टळतील.

**(३) औषधांच्या किंमती नियंत्रणाबाबत (औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३).**

औषधांच्या किंमती नियंत्रित ठेवण्यासाठी जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ अंतर्गत औषध किंमत नियंत्रण आदेश केंद्र शासनाद्वारे पारित करण्यात आला. केंद्र शासनाने औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ पारित केला असून तो दिनांक १५ मे, २०१३ पासून संपुर्ण देशासाठी लागू करण्यात आला आहे. यापूर्वी औषध किंमत नियंत्रण आदेश १९९५ अस्तित्वात होता व या आदेशा अंतर्गत फक्त ७६ औषधांच्या किंमती नियंत्रित होत्या. सुधारित २०१३ च्या आदेशानुसार राष्ट्रीय अत्त्यावश्यक औषधे सूची (NLEM) मधील एकूण ३८४ अत्यावश्यक औषधांच्या किंमती या आदेशाद्वारे नियंत्रित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे रुग्णांना अत्यावश्यक औषधे रास्त दरात उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

**(४) औषधांच्या आक्षेपार्ह जाहिराती.**

औषधांच्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवण्यासाठी औषधे व जादुटोणादी (आक्षेपार्ह जाहिराती) कायदा, १९५४ असून या कायद्याची अंमलबजावणी प्रशासनाद्वारे केली जाते. या कायद्यांच्या तरतुदीनुसार जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करणा-या व नागरीकांची आर्थिक लूट करणा-या भ्रामक व फसव्या जाहिराती विविध प्रसार माध्यमातुन प्रसारित होत असल्यास सदर जाहिराती तपासून त्यावर कारवाई करण्यात येते. प्रशासनाने वेळोवेळी धडक मोहिम राबवून वेगवेगळ्या टि. व्ही. चॅनेल्सच्या संबंधित व्यक्ती, जाहिरातींमध्ये काम करणारे कलाकार, वृत्तपत्रे व इतर संबंधित व्यक्ती यांच्या विरूध्द कारवाई केलेली आहे. तसेच आवश्यक त्या प्रकरणी पोलीसांकडे गुन्हा नोंदविलेले आहेत.

**(ब) अन्न विभाग.**

राज्यामध्ये दिनांक ५ ऑगस्ट, २०११ पासून नवीन अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व अधिनियम २०११ ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. सदर अधिनियम व त्याखालील नियम आणि नियमन यांच्या अंमलबजावणीद्वारे राज्यातील जनतेस आरोग्यपूर्ण, गुणवत्तापूर्ण व खात्रीचे अन्न उपलब्ध करून देण्याबाबतची सुविधा निर्माण झाली आहे. सदर अधिनियमांची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर खालील प्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

(१) **अन्न व्यवसायिकांचे परवाने / नोंदणी :-** राज्यात दिनांक ०५ ऑगस्ट २०११ पासुन १ मार्च २०२५ पर्यंत एकुण **१,७५ ,२०३** अनुज्ञप्ती **व ८,५८,०२१** नोंदनीधारक अन्न व्यावसायिकांची नोंदणी झालेली आहे. राज्यामध्ये FosCos प्रणाली द्वारे ऑनलाईन अन्न व्यवसायिकांची नोंदणी व परवाने देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

**(२) प्रशासकीय सुधारणा :-** राज्यामध्ये दिनांक ५ ऑगस्ट, २०११ पासून अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व अधिनियम २०११ ची अन्न व औषध प्रशासनाच्या क्षेत्रीय यंत्रणेमार्फतच अंमलबजावणी होत आहे. राज्यातील अन्न व्यवसायिकांचे त्यांच्या सर्वसाधारण घनतेच्या प्रमाणात भौगोलिकरित्या योग्य असे कार्यक्षेत्र शासन अधिसूचना क्रमांक :- असुका/कार्यक्षेत्र/म. रा./अ व औ प्र/१७२/७, दिनांक ०८ मार्च २०२२ अन्वये अधिसूचित केले असून त्या कार्यक्षेत्राअंतर्गत अन्न सुरक्षा बाबत सर्व जबाबदारी ही तेथील अंन्न सुरक्षा अधिकारी व पद निर्देशित अधिकारी यांच्यावर सुपुर्त करण्यात आली आहे.

**(३) अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांची अंमलबजावणी:-** अन्न व्यवसायिकांची नोदणी पूर्वीच सदर अन्न व्यवसायिकांची त्यांच्या वैयक्तिक घटकांसाठी अन्न सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली (Food safety Management System) तयार करून त्याचा अवलंब करणे बंधनकारक आहे. त्यादृष्टिने होत नसेल तर त्यांना सुरवातीस सुधारणा नोटिसेस देणे, त्यानंतरही त्यांनी त्या प्रमाणे स्वतःच्या व्यवसायात सुधारणा केली नाही तर त्यांच्या विरुध्द अधिनियमांतील तरतुदीनुसार कारवाई करण्याची राज्यामध्ये सुरवात झालेली आहे. त्याचबरोबर छोटे अन्न व्यवसायिकांच्या बाबतीत त्यांनी गुणवत्ता सुधारण्याकरिता त्यांना तडजोडीने दंड करण्याची तरतुद असून त्याची अंमलबजावणी राज्यामध्ये व्यापक प्रमाणांत सुरू झालेली आहे. जे मोठे अन्न व्यवसायिक अधिनियमांचा विसंगत व्यवसाय करतात त्यांच्या विरुध्द न्यायालयीन प्रकरणा बरोबरच व न्यायालयीन प्रकरणाखेरीज द्रव्य दंडाचीही तरतुद अधिनियमात असून त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. याबाबतही महाराष्ट्र राज्य हे देशामध्ये अग्रेसर आहे.

या वरील अधिनियमांची / नियमांची / आदेशांची राज्यात अंमलबजावणी करून जनतेला दर्जेदार व सुरक्षित अन्न मिळण्यासाठी खालील प्रकारची यंत्रणा निर्माण करण्यात आलेली आहे.

**राज्यस्तरीय :-** आयुक्त-सह आयुक्त-सहायक आयुक्त-अन्न सुरक्षा अधिकारी

**विभागस्तरीय** :- सहआयुक्त-सहायक आयुक्त- अन्न सुरक्षा अधिकारी

**जिल्हास्तरीय** :- सहायक आयुक्त- अन्न सुरक्षा अधिकारी

**(४) जनतेच्या आरोग्यास धोकादायक असलेल्या अन्न पदार्थाबाबत :-** अधिनियमातील तरतुदी नुसार राज्यातील जनतेच्या आरोग्यास जे अन्न पदार्थ धोकादायक आहेत किंवा ज्यामुळे मानवी जीवन असुरक्षित होऊ शकते, अशा अन्न पदार्थावर एक वर्षाकरिता बंदी घालण्याचे अधिकार अन्न सुरक्षा आयुक्त यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार सन २०१२ -१३ पासून दरवर्षी गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखु व सुगंधित सुपारी इत्यादि अनावश्यक मानवी आरोग्यावर (कॅन्सर, अक्युट मॉस्कपर मॅग्नेशिया, कार्डिक अरेस्ट, ल्युकोफालकिया ओरल कॅन्सर, अनावश्यक शरिरवाढ, आतड्यांचा कॅन्सर इत्यादि) दुष्परिणाम करणा-या घटकांवर बंदी घातली आहे. देशातील बहुतांशी राज्याने अशी

बंदी गुटखा व तत्सम पदार्थांवर घातलेली असली तरी महाराष्ट्र राज्य हे बंदीची अंमलबजावणी करण्यामध्ये संपूर्ण देशात अग्रेसर आहे.

**क ) औषध व अन्न नियंत्रण प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य-**

राज्यातील जनतेस गुणवत्तापूर्ण अन्न व औषध मिळण्याकरिता इतर गोष्टी बरोबरच, 'जे अन्न औषध व्यवसायिक चुकीच्या पध्दतीने त्यांची उत्पादने बाजारामध्ये विक्रीसाठी आणतात त्यांच्या विरुध्द कारवाई करून अशा प्रवृत्तीस प्रतिबंध करण्याकरिता सुध्दा अन्न व औषध प्रशासनामार्फत कार्यवाही केली जाते. त्याचाच एक भाग म्हणजे अन्नाच्या बाबतीत अन्न सुरक्षा अधिकारी व औषधांच्या बाबतीत औषध निरीक्षक यांना दरमहा गुणवत्ता चाचणी साठी नमुने घेण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे . सदर अन्न / औषधाचे नमुने घेतल्यानंतर त्यांचे औषध व अन्न नियंत्रण प्रयोगशाळांमध्ये विश्लेषण करण्यात येऊन विश्लेषणाच्या आधारे जर गुणवत्ता पूर्ण उत्पादने नसल्यास त्यांचेवर प्रशासकीय कारवाई / न्यायालयीन कारवाई केली जाते.

राज्यात प्रशासनाच्या मुंबई, छत्रपती संभाजी नगर आणि नागपूर येथे अद्यावत अन्न आणि औषध चाचणी प्रयोगशाळा आहेत. राज्यामध्ये औषधे आणि अन्न विश्लेषणांची व्याप्ती वाढविणे आणि विश्लेषणाचा कालावधी कमी करणे यासाठी या प्रयोगशाळांची चाचणी क्षमता वाढविण्यात येत आहे. तसेच पुणे आणि नाशिक येथे नवीन प्रयोगशाळा उभारण्यात येत आहेत.

**ड ) दक्षता बिभाग/ गुप्तवार्ता विभाग :-**

तसेच राज्यातील अंमलबजावणी करणा-या यंत्रणेच्या कामकाजातून उद्भवणा-या भागधारकांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी आणि राज्यातील औषध विषयक बेकायदेशीर कामकाज शोधून त्याविरुद्ध प्रभावशाली कारवाई करण्यासाठी राज्यस्तरावर सह आयुक्त (दक्षता) यांच्या नियंत्रणांत गुप्तवार्ता विभाग कार्यरत आहे. गुप्तवार्ता विभागाची संरचना खालील प्रमाणे आहे.

सह आयुक्त (दक्षता) :- सहायक आयुक्त (गुप्तवार्ता)

↓

औषध निरिक्षक (गुप्तवार्ता) मुख्यालय

↓

विभागीय औषध निरिक्षक (गुप्तवार्ता)

-------------*******---------

# प्रशासनाच्या  कामकाजा बाबत माहिती .

अ. औषध विभागाद्वारे करण्यात येणारी कामे-

१. औषधे, सौंदर्य प्रसाधने उत्पादन/विक्रीसाठी परवाने देणे /त्यांचे नूतनीकरण करणे.

(i) औषधीनिर्मिती परवाने,

(ii) सौंदर्य प्रसाधने निर्मिती परवाना,

(iii) औषधाच्या पुनर्वेष्टन परवाना,

(iv) रक्तपेढी परवाना,

(v) ब्लड प्रोडक्ट परवाना,

(vi) एल. व्ही. पी. परवाना,

(vii) सार्वजनिक विश्लेषण प्रयोगशाळा अनुमती मंजुरी.

(viii) आयुर्वेदिक औषध निर्मिती परवाना,

(ix) वैद्यकीय उपकरणे निर्मिती परवाना ( प्रवर्ग अ आणि प्रवर्ग ब फक्त )

(x) औषधांच्या घाऊक व किरकोळ विक्रीसाठी परवाने देणे व त्यांचे नुतनीकरण करणे.

(xi) नार्कोटीक औषध विक्री,  वितरण परवाने मंजूर करणे व त्यांचे नुतनीकरण करणे.

(xii) अधिसूचित विषारी द्रव्ये साठा व विक्री परवाने मंजूर करणे व त्यांचे नुतनीकरण करणे.

२. उत्पादक आणि औषध विक्रेते यांच्या तपासण्या करणे व आवशक कार्यवाही करणे.

३. विश्लेषणार्थ नमुने घेणे आणि औषधे आणि सौंदर्य प्रसाधने यांच्या दर्जा बाबत खात्री करणे .

४ . कायद्याचे उल्लंघन प्रकरणी धाडी घालून / जप्ती करून आवशक कार्यवाही करणे.

५ . दर करार, निर्यात, आयात अनुषंगे परवानाधारकांना विविध प्रकारचे दाखले देणे.

६. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार चांगली उत्पादन पध्दती अनुकरून उत्पादन करणाऱ्या उत्पादकांना WHO GMP प्रमाणपत्र देणे.

**परवाने मिळण्यासाठी अर्ज करण्याची पध्दती, आवशक कागदपत्रे आणि शुल्क :-**

इच्छुक अर्जदार हे प्रशासनाच्या खालील संकेत स्थळावर जाऊन अर्ज कसा करावा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, आवश्यक शुल्क याबाबत माहिती प्राप्त करून घेऊ शकतात.

## fdamfg.maharashtra.gov.in

या संकेतस्थळावर गेल्या नंतर Sales new ID & PWD या विंडोवर क्लिक केल्यानंतर Sales Guideline दिसेल. त्या  Sales Guideline मध्ये अर्ज कसा करावा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे , आवश्यक शुल्क याबाबत माहिती उपलब्ध  आहे.  उत्पादन परवान्याबाबत सुद्धा याप्रमाणे या संकेत स्थळावर माहिती उपलब्ध आहे.

ब . अन्न विभाग

अन्न विभागामार्फत खालील कायदे राबविण्यात येतात-

- ✓ ५ ऑगस्ट, २०११ पासून नवीन अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व अधिनियम २०११

अन्न विभाग करीत असलेली कामे

- ✓ अन्न आस्थापनांच्या तपासण्या करणे.
- ✓ संशयित अन्न पदार्थाचे नमुने घेणे.
- ✓ भेसळयुक्त अन्न नमुन्याप्रकरणी प्रशासकीय कारवाई अंतर्गत अन्न परवाना निलंबित करणे अथवा रद्द करणे तथा खटले दाखल करणे.
- ✓ अन्न भेसळीबाबत येणाऱ्या तक्रारींची चौकशी करणे.
- ✓ भेसळयुक्त अन्न पदार्थ उत्पादक व विक्रेत्यावर धाडी टाकणे.
- ✓ अन्न विषबाधा प्रकरणांची चौकशी करणे.
- ✓ अन्न भेसळ प्रदर्शनाच्या माध्यमातून जनजागृती करणे.

**परवाने मिळण्यासाठी अर्ज करण्याची पध्दती , आवशक कागदपत्रे आणि शुल्क :-**

या बाबत माहिती खालील नमूद संकेत स्थळावर आहे :-

Foscos.fssai.gov.in

**क . प्रशासनातील अधिकारी व त्यांची कामे :**

**आयुक्त** - प्रशासनाचे प्रमुख आहेत. तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याखाली अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून अधिसूचित आहेत.

**सह आयुक्त (औषधे) मुखालय** - औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० अंतर्गत महाराष्ट्रासाठी औषध नियंत्रण प्राधिकारी आहेत .

**सह आयुक्त (दक्षता)** - प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्याविरुद्ध प्राप्त् होणाऱ्या तक्रारी संदर्भातील कामकाज पाहतात.

**सह आयुक्त (विधी)-** प्रशासन राबवीत असलेल्या सर्व कायदेविषयक बाबीचे व प्रशासकीय बाचीचे कामकाज पाहतात.

**सह आयुक्त (अन्न) मुखालय** - अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या अंमलबजावणीच्या ध्येयधोरण ठरविण्याचे कामी मा. आयुक्तांना मदत करतात.

**मुख्य प्रशासकिय अधिकारी-** प्रशासन राबवित असलेल्या सर्व कायदे विषयक बाबींचे व प्रशासकीय बाबींचे कामकाज पाहातात.

**विभागीय सह आयुक्त ( औषधे)** - विभाग प्रमुख आणि परवाना प्राधिकारी उत्पादन परवाने.

**विभागीये सह आयुक्त (अन्न)** - विभाग प्रमुख, न्यानिर्णय अधिकारी.

**सहायक आयुक्त (औषधे)** - जिल्हा/ परिमंडळ प्रमुख व विक्री आस्थापनाचे परवाना प्राधिकारी.

**सहायक आयुक्त (अन्न )** - जिल्हा/ परिमंडळ प्रमुख व अन्न अश्थापणा परवाना प्राधिकारी.

**औषध निरीक्षक** - क्षेत्रीये तपास अधिकारी .

**अन्न सुरक्षा अधिकारी** :- क्षेत्रीये तपास अधिकारी .

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ :- या अधिनियम अंतर्गत अन्न व औषध प्रशासन, म.राज्य प्रशासनामार्फत पुरविण्यात येणा-या सेवा याबाबतचे विवरण सोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणे

परिशिष्ट अ

| अ.क्र. | लोकसेवा | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल अधिकारी | व्दितीय अपिल अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अन्न व्यावसायिकांना अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ व त्याखालील नियम यांच्या नुसार नोंदणी देणे | २१ दिवस | सहायक आयुक्त (अन्न) | आयुक्त | - |
| २ | अन्न व्यावसायिकांना अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ व त्याखालील नियम यांच्या अनुसार वस्तुनिर्माण व विक्री यासाठी अनुज्ञप्ती देणे. | ४५ दिवस | सहायक आयुक्त (अन्न) | आयुक्त | - |
| ३ | औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० व त्याखालील नियम यांच्या अनुसार फुटकळ विक्री औषधी भंडार यासाठी अनुज्ञप्ती देणे. | ३० दिवस | सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| ४ | औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० व त्याखालील नियम यांच्या अनुसार घाउक विक्री औषधी भंडार यासाठी अनुज्ञप्ती देणे | ३० दिवस | सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| ५ | औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० व त्याखालील नियम यांच्या अनुसार औषधी उत्पादने यासाठी अनुज्ञप्ती देणे | ६० दिवस | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) मुख्यालय | आयुक्त |

अन्न व औषध प्रशासन, म.राज्य मार्फत पात्र व्यक्तींना पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा

| औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्या खालील नियम यांच्या अनुसार औषध विक्री परवाना धारकांसाठी लोकसेवा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनु.क्र | लोकसेवा | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी |
| ६. | जागेत बदलामुळे नवीन परवाना मंजुरी | ३० | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| ७. | घटनेतील बदलामुळे नवीन परवाना मंजुरी | १४ | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| ८. | नोंदणीकृत फार्मासिस्ट नेमणूक व बदल नोंदणी | १० | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| ९. | सक्षम व्यक्ती नेमणूक व बदल नोंदणी | १० | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| १०. | पेढीच्या नावात बदल | १० | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| ११. | ना-अपराध प्रमाणपत्र | १० | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| १२. | दुय्यम परवाना प्रमाणपत्र | १० | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| १३. | किरकोळ औषध विक्री परवाना नुतनीकरण | १० | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |
| १४. | घाऊक औषध विक्री परवाना नुतनीकरण | १० | सहायक आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) | आयुक्त |

अन्न व औषध प्रशासन, म.राज्य मार्फत पात्र व्यक्तींना पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा

| औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्या खालील नियम यांच्या अनुसार औषध उत्पादक परवाना धारकांसाठी लोकसेवा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अनु.क्र | लोकसेवा | नियत कालमर्यादा (दिवस) | पदनिर्देशितअधिकारी | प्रथम अपीलप्राधिकारी | द्वितीय अपीलप्राधिकारी |
| १५. | नवीन उसनवार औषध उत्पादन परवाना (आयुर्वेद व्यतिरिक्त) | २० | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| १६. | चाचणी परवाना | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| १७. | घटनेतील बदलामुळे नवीन परवाना | ३० | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| १८. | सक्षम तांत्रिक व्यक्ती नेमणूक मान्यता | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| १९. | संस्थेच्या नावात बदल | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २०. | कामगिरी प्रमाणपत्र | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २१. | वैधता प्रमाणपत्र | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २२. | क्षमता प्रमाणपत्र | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २३. | उघड (मोफत) विक्री प्रमाणपत्र | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २४. | ना-अपराध प्रमाणपत्र | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २५. | उत्पादन व विपणन प्रमाणपत्र | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २६. | चांगली उत्पादन पद्धती प्रमाणपत्र | ३० | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २७. | चांगली चाचणी पद्धती प्रमाणपत्र | ३० | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |
| २८. | औषध उत्पादन परवाना नुतनीकरण | १५ | विभागीय सह आयुक्त (औषधे) | सह आयुक्त (औषधे) (मुख्यालय | आयुक्त |